# प्राजक्त

संस्थापक व आद्य संस्थापक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी

वर्ष : ४१ अंक : फोन : ०२३१-२५४०४२७ कोल्हापूर ता. एप्रिल २०१२ किंमत २ रुपये

Reg. No. GR/RNP/KLP 136/09-11 Posted in Kolhapur

आम्ही भिडे

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

(खासगी वितरण)

अंक ११ वा एप्रिल २०१२

वर्ष दुसरे, त्रैमासिक क्र. १

Website : www.bhidekul.in

Email: office@bhidekul.in


## संपादकीय

दरवर्षी भरणारे भिडे संमेलन हे आपल्या भिडे बंधु/भगिनींना (गावोगावच्या) आपुलकीने व आनंदाने एकमेकांना भेटण्याची संधी असते. यावर्षी महाराष्ट्र चित्तपावन संघाने सर्व चित्तपावन ब्राह्मणांची संमेलने एकत्रित पुण्याला व्हावी व ती शक्यतो २१ ते २५ डिसेंबर २०११ या काळात घ्यावी असे सुचविले होते. कारण त्यांनी त्याच काळात चित्तपावन औद्योगिक प्रदर्शन भरविण्याचे ठरविले होते. संमेलनाची जागा टिळक महाराष्ट्र विद्यापीठ परिसर, जेथे २००७ साली जागतिक चित्पावन संमेलन भरवून यशस्वी केले, तेथेच होती. साहजिकच भिडे संमेलन २५ डिसेंबरला पुणे येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठात झाले. संमेलनासाठी जागा व जेवणाची व्यवस्था महाराष्ट्र चित्तपावन संघाने केली होती.

यावर्षी संमेलनाची निमंत्रणेही चित्पावन संघाच्या वेबसाइट/वृत्तपत्रातून पाठविली. तसेच भिडे प्रतिष्ठानच्या वेबसाइटवरून पाठविली. साहजिकच त्याचा परिणाम(थोडाफार) उपस्थितीवर झाला. तरीसुद्धा २५० पेक्षा जास्त भिडे बंधूभगिनी एकत्र आले.

यावर्षी नवीन बांधलेल्या प्रशस्त व भव्य हॉलमध्ये संमेलन भरले होते. साहजिकच संमेलनाला एक भारदस्तपणा आला. प्रारंभी भिडे कुळातील तरुण मुलींनी स्वागत गीत म्हटले. नंतर नेहमीच्या प्रथेप्रमाणे गणेशवंदन, परशुराम वंदन झाले.

उपस्थितांचे स्वागत प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष वसईचे श्री. मुकुंदराव भिडे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकांत प्रतिष्ठानचे कुलवृत्ताचे काम जरी पूर्ण झाले असले तरी पुढील उद्दिष्टे साध्य करायची आहेत. त्या करिता भिडे तरुणांनी पुढे यावे आणि प्रतिष्ठानचे काम सांभाळावे असे आवाहन केले.

त्यानंतर मागील वर्षभरांत निधन पावलेल्या भिडे बंधु/भगिनींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संमेलनाला प्रतिष्ठानचे नूतन अध्यक्ष श्री. माधवराव भिडे प्रकृति अस्वास्थ्यामुळे येऊ शकले नाहीत. यावेळी संमेलनाचे अध्यक्ष होते, पुणे येथील मेजर जनरल श्री. संजय वामन भिडे. हे साताऱ्या जवळील केळवे गावचे असून त्यांनी आपल्या भाषणात केळव्याहून पुण्याला कसा आलो, पुढे आर्मीत कसा गेलो व तेथील काही अनुभव सांगितले. त्यांचे काश्मीर मधील अनुभव फारच रोमांचक होते.

दर तीन महिन्यांनी प्रतिष्ठानचे - आम्ही भिडे (प्राजक्त) हे त्रैमासिक प्रकाशित होते. ते संमेलनाच्या निमित्ताने विशेषांकाच्या स्वरूपात काढलेले होते. त्याचे प्रकाशन अध्यक्षांच्या हस्ते संपन्न झाले. त्याचे संपादक होते कुलवृत्ताचे काम केलेले श्री. प्रभाकर भिडे. या अंकात त्यांनी तरुण पिढीला मार्गदर्शक होतील या उद्देशाने काही कर्तृत्ववान भिडे मंडळींची माहिती समाविष्ट केली आहे. तसेच कांही कविता आणि कांही विषयांवर लेख प्रकाशित केल्याचे सांगितले. 'आम्ही भिडे'ची आर्थिक बाजू, छपाई वगैरे संबंधीचे निवेदन पुण्याचे प्रतिष्ठानचे कार्यकर्ते श्री. दिलीप भिडे यांनी केले.

या संमेलनात प्रथमच एका वेगळ्या विषयावर - 'चित्पावनी' या बोली भाषेवर डॉ. सौ. वसुधा भिडे, पुणे यांनी लिहिलेले 'चित्पावन आणि चित्पावनी' हे पुस्तक प्रकाशित झाले. त्यांनी पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधून चित्पावनी बोलीवर बरेच संशोधन करून त्यावर एक प्रबंध पुणे विद्यापीठाकडून PHD साठी मान्य करून घेतला. त्यांना या कामात पुण्याच्या खासगीवाले (लिमये) यांनी बरीच मदत केली होती. म्हणून या पुस्तकाचे प्रकाशन त्याच्या हस्ते केले गेले. त्यावेळी डॉ. वसुधा भिडे यांनी आपल्या मनोगतात पुस्तकाची पार्श्वभूमी तसेच त्याकरिता त्यांनी मेहनत घेतली त्या संबंधीचे विस्तृत निवेदन केले. तसेच खासगीवाले (लिमये) यांनी त्यांची भूमिका व चित्पावनी बोलीवर पुस्तक यावे ही त्यांची इच्छा पूर्ण झाल्याचे सांगितले.

सौ. वसुधा भिडे यांनी अन्य बऱ्याच क्षेत्रात उत्कृष्ट काम केल्याबद्दल यावर्षीचा 'आदर्श सून पुरस्कार' त्यांना देण्यात आला. हा पुरस्कार मिरज येथील सौ. मेधा (अनुराधा) अविनाश भिडे यांनी पुरस्कृत केलेला आहे. त्यानंतर सांगलीकरांनी पुरस्कृत केलेला नाट्य, साहित्य, कला क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला द्यावयाचा पुरस्कार पुणे येथील 'सूर्यशिबिर' प्रकल्पाचे जनक श्री. निळकंठ लक्ष्मण भिडे यांना संमेलनाचे प्रमुख पाहुणे लेफ्टनंट जनरल संजय भिडे यांचे हस्ते देण्यात आला. तसेच २०१०-११ या वर्षासाठीचा पुणे येथील बंधुद्वय श्री. रामचंद्र महादेव आणि कै. वि. म. भिडे यांनी पुरस्कृत केलेला ''साहस क्रीडा पुरस्कार'' श्री. विक्रम दिलीप भिडे यांना श्री. संजय भिडे यांचे हस्ते देण्यात आला.

यानंतर श्री. दामोदर भिडे यांनी गेल्या वर्षात वेगवेगळ्या क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या भिडे मंडळीतील १२ गुणवंतांच्या कामगिरीचे थोडक्यात निवेदन केले आणि त्या पैकी संमेलनाला उपस्थित असलेल्या गुणवंतांचे अध्यक्षांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन कौतुक करण्यात आले.

प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे यांनी कार्यक्रमाच्या अखेरच्या सत्रात आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर सुमारे दीड तास करमणुकीचे कार्यक्रम झाले. त्यात सौ. मीनाक्षी भिडे रत्नागिरी आणि अन्य कलाकारांनी सादर केलेल्या भरतनाट्यम्चा एक बहारदार कार्यक्रम सादर झाला. त्यानंतर लगेचच सौ. वीणा केळकर (भिडे) आणि अन्य कलाकारांच्या सुगम संगीताच्या कार्यक्रमाने उपस्थितांना एक वेगळाच आनंद उपभोगता आला.

दरवर्षी होणारे ज्येष्ठ व्यक्तींचा सत्कार व विद्यार्थी गुणगौरव हे दोन्ही कार्यक्रम पुण्याच्या सौ. धनश्री भिडे यांनी आणि अन्य संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ. वरदा भिडे, पुणे यांनी आपुलकीने व उत्साहाने नियोजन करून उत्तम प्रकारे पार पाडले.

कर्नल श्री. सुनील भिडे यांनी आभार प्रदर्शन केल्यावर सौ. राधिका भिडे यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**प्रभाकर शंकर भिडे**
**डोंबिवली - ९८९२५६३१५४**

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा**

## दु:खद निधन

• भिडे कुळातील निवेंडी वंशातील आपले एक कुलबंधू आणि हृदयशस्त्रक्रियेमध्ये प्राविण्य संपादन केलेले सुप्रसिद्ध डॉ. रामचंद्र (ऊर्फ नंदू/नरेंद्र) काशिनाथ यांचे अल्पशा आजाराने दि. ३ फेब्रुवारी २०१२ या दिवशी जर्मनी येथे दु:खद निधन झाले.

हृदयावर जलदगतीने शस्त्रक्रिया करणारे भारतातील पहिले हृदयशल्यतज्ञ, कृत्रिम हृदय तयार करण्यासाठी संशोधन करणारी आणि हृदय शस्त्रक्रियाशास्त्रात (M.C.H.) पारंगत असलेली अशी एक व्यक्ती अचानकपणे आपल्यातून निघून जाणे ही घटना आपणासर्वांना दु:खकारक आहेच पण त्यांच्या कुटुंबीयांना या निधनामुळे झालेल्या तीव्र दु:खावर मात करणे ही अधिक कठिण गोष्ट आहे.

डॉ. नंदू भिडे हे चांगले क्रीडापटू आणि राज्य स्तरावरील पारितोषिक विजेते होते. शस्त्रक्रियेमध्ये विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळविणारे डॉक्टर म्हणून त्यांची देशात परदेशात ख्याती होती.

अशा व्यक्तीच्या निधनामुळे झालेल्या त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात सहभागी होऊन या दु:खावर मात करण्याचे सामर्थ्य त्यांच्या कुटुंबीयांना प्राप्त व्हावे यासाठी आणि त्यांच्या आत्म्याला शांती मिळावी यासाठी आपण सर्व भिडे, भिडे प्रतिष्ठानच्यावतीने परमेश्वराकडे मनस्वी प्रार्थना करूया.

• तसेच श्रीमती उज्ज्वला अनंत भिडे या दि. २८ नोव्हेंबर २०११ रोजी स्वर्गवासी झाल्या.

• **सौ.** सरोज मनोहर भिडे, पुणे. यांचे दि. २६ फेब्रुवारी २०१२ रोजी ब्रेनहॅमरेजमुळे देहावसान झाले.

या सर्व मृत व्यक्तींच्या कुटुंबियांचे दु:खात सर्व भिडे मंडळी सामील आहोत. ईश्वर त्यांचे मृतात्म्यास शांती देवो ही प्रार्थना !

**दामोदर भिडे, डोंबिवली.**

## आवाहन

**९ ऑक्टोबर २०११ रोजी पुणे येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासद वर्गणी मधील १०० रु. चे सर्वसाधारण सभासद वर्ग रद्द केलेला आहे. त्यामुळे आश्रयदाता – रु. १०,०००/– हितचिंतक रु. ५,०००/– आजीव सभासद रु. १,०००/– हे तीनच वर्ग ठेवण्यात आलेले आहेत. तसेच या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये त्या अनुषंगे खालील निर्णय घेण्यात आला ''जे सभासद १०० रुपये भरून सभासद झालेले आहेत, त्यांनी अधिक ९०० रुपये भरून आजीव सभासदत्व घ्यावे.'' अशा सभासदांना नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान ९०० रुपये भरून आजीव सभासदत्व घेण्याचे विनंतीपूर्वक आवाहन करीत आहे याची नोंद घ्यावी.**

## जानेवारी २०१२ ते मार्च २०१२ पर्यंतचे देणगीदार

| | | |
|---|---|---|
| १) श्री. विजय रघुनाथ भिडे, ठाणे | रु. १,०००/– | देणगी(कॉर्पस) |
| २) श्री. विनायक सखाराम भिडे, डोंबिवली | रु. १,०००/– | देणगी (कॉर्पस) |
| ३) श्री. शरद नारायण भिडे, डोंबिवली | रु. १,००१/– | देणगी (कॉर्पस) |
| ४) श्री. श्रीकांत गंगाधर भिडे, शहद | रु. १,००१/– | सभासद वर्गणी |
| ५) श्री. सुहास श्रीधर भिडे, बोरिवली (सिंगापूर) | रु. १०,०००/– | देणगी (कॉर्पस) |
| ६) सौ. पद्मा वि. बापट, गोरेगाव (मुंबई) | रु. १००/– | सभासद वर्गणी |
| ७) सौ. विजया म. जोशी, बोरिवली | रु. १००/– | सभासद वर्गणी |
| | रु. ३००/– | देणगी (कॉर्पस) |
| ८) श्री. जयंत अनंत भिडे, ठाणे | रु. १,००१/– | देणगी (कॉर्पस) |
| ९) श्री. निरंजन रघुनाथ भिडे, नागपूर | रु. १००/– | देणगी (कॉर्पस) |
| १०) श्री. माधव नारायण भिडे, नाशिक | रु. १,०००/– | देणगी (कॉर्पस) |
| ११) सौ. माधुरी प्रमोद भिडे, डोंबिवली | रु. ५००/– | देणगी (कॉर्पस) |
| १२) श्री. मधुकर शंकर भिडे, मुद्रे (कर्जत) | रु. ५,०००/– | देणगी (कॉर्पस) |
| १३) सौ. सुषमा अनंत भिडे, पाली | रु. ३००/– | देणगी (कॉर्पस) |
| १४) श्रीमती मालती रघुनाथ भिडे, ठाणे | रु. १,०००/– | देणगी (कॉर्पस) |
| १५) श्री. विवेक श्रीधर भिडे, बोरिवली | रु. १,०००/– | आजीव सदस्य वर्गणी |
| १६) श्री. वामन विश्वनाथ भिडे, पुणे | रु.१०,०००/– | आश्रयदाता |
| १७) श्री. श्रीमती विजयाताई भिडे, पुणे | रु. १,०००/– | देणगी (कॉर्पस) |
| १८) श्री. अनंत शरद भिडे, चिपळूण | रु. १,०००/– | आजीव सदस्य वर्गणी |
| १९) श्री. दीनानाथ पांडुरंग भिडे, मुलुंड (मुंबई) | रु. १,०००/– | आजीव सदस्य वर्गणी |
| २०) श्री. दिलीप वासुदेव भिडे, पुणे | रु. १,०००/– | देणगी (कॉर्पस) |
| २१) श्री. बाळकृष्ण त्रिंबक भिडे, पुणे | रु. ५,०००/– | हितचिंतक |
| २२) श्री. अश्विन व्ही. भिडे, पुणे | रु. ३,०००/– | देणगी (कॉर्पस) |
| २३)श्री. आनंद विष्णू भिडे, बुलडाणा | रु. १,०००/– | आजीव सदस्य वर्गणी |
| २४) श्री. जयंत जगन्नाथ भिडे, बुलडाणा | रु. १,०००/– | आजीव सदस्य वर्गणी |
| २५) श्री. पी. जे. भिडे, कोलकाता | रु. १,०००/– | आजीव सदस्य वर्गणी |
| २६) श्री. श्रीपाद नारायण भिडे, सातारा | रु. १,०५०/– | आजीव सदस्य वर्गणी |
| २७) श्री. मिलिंद दिगंबर भिडे, छत्तीसगड | रु.१०,०००/– | आश्रयदाता |
| २८) श्रीमती शशिताई मु. घुले, पुणे | रु. ३,०००/– | देणगी (कॉर्पस) |
| २९) मीना इलास्टोमर्स प्रा. लि.(सौ. केतकर),नाशिक | रु. ५,०००/– | देणगी (कॉर्पस) |


**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान**

❖ पुणे कार्यालय : ९२, शुक्रवार पेठ, रंजन को.-ऑप. हौसिंग सोसायटी, मंडई गणपती जवळ, पुणे – ४११ ००२

फोन : दिलीप भिडे ९६५७५४१२३६

❖ पत्रव्यवहारासाठी पत्ता ❖

विनायक वि. भिडे

५५३, नारायण पेठ, माती गणपती जवळ, भिडे वाडा, पुणे ४११ ०३०.

फोन – २४४५३२७४ मोबा : ९५५२२१६९६७



### संपादक मंडळ

संपादक – श्री. विद्याकर भिडे.

(अंक ११ वा)

संपादक मंडळ – श्री. प्रभाकर भिडे, श्री. दामोदर भिडे, श्री. दिलीप भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. श. ह. भिडे, सौ. योगिनी भिडे, ले. कर्नल श्री. सुनील वा. भिडे

सल्लागार मंडळ – सुनील भिडे (अभिरुची), नी. ल. ऊर्फ अण्णा भिडे (सूर्यशिबीर), श्रीमती शशिताई घुले.

अक्षर जुळणी – श्री. विनायक भिडे (पुणे)

# सौर ऊर्जेचा विकास ही काळाची गरज

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशाची एकूण विद्युत निर्मिती क्षमता अंदाजे १३०० ते १४०० मेगा वॉट इतकी होती. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या माहितीप्रमाणे ती आजमितीस जवळपास १,३०,००० ते १,४०,००० मेगावॉट झाली आहे. म्हणजे १०० पटीने वाढली आहे. याच काळात भारताची लोकसंख्या फार तर तिप्पट किंवा चौपट झाली आहे. म्हणजे दरडोई विद्युत ऊर्जेची उपलब्धता स्वातंत्र्यकाळापेक्षा खूपच वाढली आहे. असे असले तरी याच काळात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक प्रगती झाल्याने विजेची मागणीही त्यापेक्षा अधिक प्रमाणात वाढली आहे. म्हणून विजेची मागणी आणि उत्पादन यात बरीच तफावत निर्माण झाली आहे. शिवाय दिवसेंदिवस ही तफावत वाढत आहे. साहजिकच एकेकाळी विजेच्या निर्मितीत अग्रेसर असणाऱ्या महाराष्ट्रात भारनियमनाची समस्या ही सरकारची मोठी डोकेदुखी होऊन बसली आहे.

या समस्येचे निराकरण स्थायी स्वरूपांत करावयाचे असेल तर ऊर्जानिर्मितीच्या नव्या वाटा शोधून काढून त्यांचा पाठपुरावा करणे अत्यंत निकडीचे आहे. भारतातील एकूण विद्युत निर्मितीपैकी अंदाजे ६५ टक्के वीज कोळसा आणि तेल जाळून केली जाते. अंदाजे २५ टक्के वीज जलाशयांवर तर ७ टक्के इतर पुनर्निर्मितीक्षम साधनांवर आधारित आहे. अणुशक्तीचा मोठा बोलबाला असूनही, अणुविद्युत ऊर्जेचा वाटा मात्र अंदाजे तीन टक्के इतका अल्प आहे. यामध्ये लक्षात घेण्याची बाब म्हणजे भारताचा अणुविकासाचा कार्यक्रम पन्नास वर्षाहून अधिक काळापासून चालू आहे. सध्या तर हाच एकमेव पर्याय भविष्यात भारताला ऊर्जास्वातंत्र्य मिळवून देऊ शकतो असा समज जनतेच्या मनात रुजविला जात आहे. हा पर्याय एकमेव नसला तरी महत्त्वाचा नक्कीच आहे. भूगर्भातील कोळसा, तेल वगैरे इंधनसाठे प्रचंडवेगाने उपसून काढले जात आहेत. अशाच प्रकारे इंधनासाठी ते वापरले गेले तर एकविसाव्या शतकाच्या मध्यापर्यंतच पुरतील असा इशारेवजा अंदाज तज्ज्ञांनी वर्तविला आहे. म्हणूनच अणुविद्युत ऊर्जेच्या पर्यायाला महत्त्व आहे.

कोळसा, तेल, नैसर्गिक वायू यांच्या ज्वलनामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. वातावरणातील कार्बन डायऑक्साईड आदींची वाढती पातळी आटोक्यात आणणे अधिकाधिक अवघड होणार आहे. म्हणूनच पर्यावरणाच्या संरक्षणाला अग्रक्रम मिळणे निकडीचे झाले आहे. जलविद्युत निर्मितीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास अत्यल्प (जवळजवळ नगण्य) प्रमाणात होतो, म्हणून जलविद्युत निर्मितीचा पर्याय वाढीला लावणे निश्चितपणे श्रेयस्कर आहे. तथापि भारतात आधीच मोठमोठे जलविद्युत प्रकल्प कार्यरत असताना नवे जलाशय मोठ्या प्रमाणावर निर्माण करून नवे उभारले जाण्याची शक्यता खूप कमी आहे. जलविद्युत निर्मितीतंत्राची जमेची बाजू म्हणजे हा पुनर्निर्मितीक्षम ऊर्जास्रोत आहे.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला आता ५० वर्षाहून अधिक काळ लोटला असूनही आपण आणखी एका महत्त्वाच्या ऊर्जास्रोत पर्यायाकडे गांभीर्याने पाहिलेले नाही. हा ऊर्जास्रोत म्हणजे सौरऊर्जा. भारताची भौगोलिक स्थिती इंग्लंड, युरोप, जपान, कॅनडा वगैरे देशांपेक्षा विषुववृत्ताच्या खूप जवळ असल्याने सौरऊर्जा आपल्याकडे मुबलक प्रमाणात मिळते. या निसर्गनिर्मित अखंड ऊर्जास्रोताकडे आपण प्राथमिकतेने लक्ष पुरविले तर विद्युत ऊर्जा निर्मितीचा प्रश्न कायमचा सुटू शकेल.

सौरऊर्जेचा वापर करून वीजनिर्मिती करण्याचे दोन प्रमुख पर्याय उपलब्ध आहेत. सौरऊर्जेचे परिवर्तन थेट विद्युत ऊर्जेत करण्याचे तंत्र फोटोव्होल्टाइक तंत्र या नावाने ओळखले जाते. तथापि या तंत्राचा अवलंब करून अजून अनेक मेगावॉट इतक्या मात्रेने विद्युत निर्मितीची मोठी आस्थापने जगातही उभारलेली नाहीत. शिवाय या तंत्रासाठी लागणारा भांडवली खर्च पारंपरिक विद्युत जनित्रांच्या तुलनेत वीस ते तीस पट अधिक असतो. म्हणून मोठ्या प्रमाणावर विद्युत निर्मितीसाठी फोटोव्होल्टाइक प्रणाली व्यवहार्य होऊ शकलेली नाही. दुसरा पर्याय म्हणजे सौरऊर्जेमुळे निर्माण होणाऱ्या उष्णतेचा उपयोग करून उच्च दाब आणि तापमान असलेली वाफ निर्माण करणे व त्यायोगे विद्युत जनित्रे चालविणे. हा पर्याय मात्र जगभरात चोखाळला गेला असून अशा प्रकल्पातून ५० ते १०० मेगावॉट इतकी विद्युत निर्मिती साध्य केली गेली आहे. अशी अनेक आस्थापने ठिकठिकाणी यशस्वीरीत्या कार्यरत आहेत. या पर्यायाचा भांडवली खर्चही त्यामानाने माफक असतो.

सूर्याचा प्रकाश रात्रीच्या आणि पावसाळ्याच्या काळात उपलब्ध नसतो हे लक्षात घेऊन पूर्ण वर्षात मिळणाऱ्या सूर्यप्रकाशावरून सरासरी काढल्यास महाराष्ट्रासाठी ही ऊर्जा दर २४ तासांमध्ये सुमारे ५.५ किलोवॉट तास प्रति चौरस मीटर भरते. म्हणजेच आपल्याला सरासरीने दर चौ.मी. क्षेत्रामागे २२९ वॉट सूर्यऊर्जा सतत मिळत असते. तीसुद्धा विनासायास, विनाखर्च ! महाराष्ट्राचे क्षेत्रफळ तीन लाख चौ. किमी आहे. म्हणजेच ही ऊर्जा ७० दशलक्ष मेगावॉट एवढी प्रचंड आहे. महाराष्ट्राचे केवळ दहा टक्के क्षेत्र वापरले आणि या ऊर्जेचे रूपांतर विजेमध्ये केवळ तीन टक्के क्षमतेने केले तरीही दोन लक्ष मेगावॉट वीज निर्माण होऊ शकते. ही वीज राज्याच्या सध्याच्या गरजेच्या १० पट आहे !

ही ऊर्जा विद्युत निर्मितीसाठी वापरता येणे अगदी सोपे नसले तरी अत्यंत अवघडही नाही. यासंबंधीच्यातंत्रज्ञानाचा अभ्यास आपल्याकडे केला गेला आहे. आता गरज आहे ती सौरऊर्जेच्या सर्व पैलूंवर मोठ्या प्रमाणावर वैज्ञानिक संशोधन करून एक सक्षम तंत्रज्ञान विकसित करण्याची. या कार्याला प्राधान्य देणे अत्यंत निकडीचे आहे.

सौरऊर्जेशी संबंधित विज्ञान व तंत्रज्ञान एवढे गोपनीय नाही. त्यामुळे अशी संयंत्रे आयात करून वेळ व श्रम वाचवावा असा सोयीस्कर सल्ला दिला जाण्याची शक्यता आहे. परंतू यासंदर्भात दूरवरचा विचार करणे श्रेयस्कर ठरेल. एक म्हणजे आयात संयंत्रांची पुरेपूर किंमत मोजावी लागते. शिवाय यासोबत रचना तंत्र दिले जात नाही. म्हणजे तंत्रज्ञाच्या संदर्भात आपण परावलंबीच राहतो. भविष्यकाळातील इंधनाच्या जागतिक टंचाईमुळे या तंत्रज्ञानाला अतिशय महत्त्व प्राप्त होणार आहे. साहजिकच सौर ऊर्जा तंत्रज्ञान विकसित करून स्वावलंबी होणे आणि जगात आघाडीवर राहणे हेच श्रेयस्कर ठरणार आहे. त्यासाठी अणुविज्ञान केंद्राच्या धर्तीवर सौरऊर्जाविज्ञान केंद्र प्रस्थापित करून त्यासाठी पुरेशी साधनसंपत्ती व स्वायत्तता देणे अंतिम हिताचे ठरेल.

**गोविंद केशव भिडे**
**(महाराष्ट्र टाइम्स चे सौजन्याने)**

## हार्दिक अभिनंदन !

**श्री. राजीव मा. भिडे, यांची कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीजूच्या (सी. आय. आय.) पुणे विभागाच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानचे वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन!**

**समस्त भिडे परिवारातर्फे आपणांस पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

**With Best Comliments From . . .**

PA

# PANDIT AJGAONKAR ASSOCIATES

SHRIYA, S. No. 41/16, ERANDAWANE,
TARATE COLONY, PUNE - 411 004
2544 7497/ 2544 7498

# पिकनिक

सौ. पूर्वा प्रमोद देवधर, (माहेरवाशीण – कु. तृप्ती दत्तात्रेय भिडे, मुंबई)

बऱ्याच दिवसांनी नव्हे नव्हे महिन्यांनी, आम्ही मैत्रिणी भेटलो बरं का ! (एकदाच्या). कधी हिला वेळ नाही, तिच्या घरी अडचण, अमकीचं कुणीतरी ॲडमिट, तमकीच्या घरी पाहुणे. कारणांची नुसती मालिका – न संपणारी, रटाळ.

दरवेळी कॅन्सलच होणारी आमची पिकनिक सालाबादप्रमाणे यंदाही ठरवली आहे. (म्हणजे अजून तरी ठरली आहे.)

काय गंमत आहे माहितेय ? सुमारे ८ ते १० वर्षे आमची पिकनिक फक्त ठरतेच आहे. जात काही नाही. त्यामुळे घरात तो एक चेष्टेचा विषयच झाला आहे. मधे तर आम्ही फर्मानच काढलं होतं की जिच्यामुळे पिकनिक कॅन्सल होईल तिने पार्टी द्यायची. पण त्यानंतर पहिल्यांदा एकीचे सासरे वारले. दुसऱ्यांदा दुसरीच्या घरात कुणीतरी आय.सी.यू. मध्ये आता अशा कारणांपुढे काही इलाज आहे का? आजारी किंवा मृत्युमुखी पडणारे सर्वांच्या सोयीने का पडणारेत ? तसं जर असतं तर आमच्या पिकनिक प्रमाणे वरीलपैकी काही घडलं नसतं. जाऊ दे, चालायचंच.

तर अशी ही आमची पिकनिक – ठरलंय असं एका रविवारी प्रत्येकीने स्वत:चं आटोपून सकाळी ७ वाजता स्टेशनवर भेटायचं. मुद्दाम स्थळ ठरवलं नाही कारण, लगेच सासर–माहेरची कामं निघतात. उदा. मागच्या वेळेस कर्जतला जाताय ना, मग माझ्या मैत्रिणीकडे ही वस्तू पोहोचव व मग पुढे जा. इति राधाच्या सासूबाई. वस्तू कशीबशी पोहोचली नंतर पण पिकनिक मात्र कॅन्सलच झाली.

आधीच्या अनुभवानुसार स्थळ सस्पेंड असं ठरलय. बरोबर नेण्यासाठी कुणीही काहीही फराळाचं करत बसायचं नाही. ही तर काळ्या दगडावरची रेघ. कारण फराळाचं घरी करत बसलं ना की कारण विचारलं जातं व नंतर ते विसरून पदार्थ संपूनही जातात. आधीचे अनुभव – ''आधीच करून ठेवलेली नानकटाई व चिवडा पाहुण्यांना द्यावा लागला व अर्धाअधिक फस्त झाला.'' इति अवंतिका. ''ताजा ढोकळा केलायसं पाहून नवऱ्याने मागितला. नाही म्हणवलं नाही. वर वॉकला जाणाऱ्या इतर साऱ्या मित्रांना चाखायला म्हणून फक्त २५ वड्या नेल्या.'' इति मधुरा. ''मुलांनी संपवू नये म्हणून लपवून ठेवलेली बालुशाही निघायच्या क्षणापर्यंत मलाच मिळाली नाही.'' इति वैशाली.

पहाटे उठून किंवा आदल्या रात्री जागून खटाटोप करून जर आमच्या तोंडी काही लागणारच नसेल तर करा कशाला ? म्हणून कॅन्सल. वेळ पडली तर उपाशी राहू. पण ती फराळाची भानगडच नको. असे अनेक टक्केटोणपे खात आम्ही आता 'तयार' झालो आहोत. हल्ली तर घरात माझी पिकनिक म्हटलं की, आबालवृद्धांकडून असे काही नामी टोमणे ऐकू येतात ना की काही विचारू नका. ''ठरली वाटतं पुन्हा ते, तुमची पिकनिक ना ? हाः हाः हाः ती काय कॅन्सलच होणार ! हाः हाः हाः (सामुदायिक हशे) काय खात्री आहे पहा सर्वांना आणि आत्मविश्वासही !

म्हणूनच आम्ही ठरवलंय मुकाट्याने बाहेर पडायचं व नंतर सावकाश मोबाइल वरून घरी कळवायचं. म्हणजे तरी सर्वांची जिरवता येईल. मुलांच्या परीक्षा आहेत म्हणजे अभ्यास आधीच करून घ्यायचा व परीक्षांच्या काळात बंद वगैरे काही होणार नाही.

एक दिवस खुल्या मनाने, खुल्या हवेत जाऊ, मजा करू, गाणी म्हणू. जाऊ जरा खुल्यावरी, खुल्यावरी, खुल्यावरी, खुल्यावरी गं !

आता पाहूया, आहे कुणाची हिंमत आमची पिकनिक कॅंसल करण्याची ? पहायचंच आहे आम्हाला पण.

तुम्हा सर्वांकडून शुभेच्छा मात्र हव्या आहेत बरं का, आशीर्वादासारख्या आणि शूऽऽऽ . . . .सांगू नका हं कुणाला . . . . . तारीख आहे १ एप्रिल. म्हणजे झाली तर पिकनिक, नाहीच झाली तर फुल्ल एप्रिल फूल !

**सौ. पूर्वा प्रमोद देवधर**
**ठाकुरद्वार – मुंबई – २**
email id - Purdeo.77@gmail.com

FINANCIAL SERVICES, LONG TERM FINANCE
WORKING CAPITAL FINANCE
COST MANAGEMENT, PROFIT IMPROVEMENT
**INVESTMENT SERVICES**
FAMILY BUDGET MANAGEMENT AND FINANCIAL PLANNING,
AGRICULTURAL LAND AND FARM HOUSES,
REAL ESTATE COMMODITIES,
MUTUAL FUNDS, POSTAL SAVINGS, P. P. F., CAPITAL GAINS BOND,
LIFE AND GENERAL INSURANCE, FIXED DEPOSITS,
TRADING IN AND IPO's OF SHARES, BONDS/DEBENTURES

**BOMBAY FINANCE & INVESTOR GROUP**
A-9, FLAT No. 303, SAKET COMPLEX, MAJIWADE, THANE - 400 601
TEL. : 2538 5461. e-mail : bomfinvest@yahoo.com

# सौ. सुमती वामन भिडे - पुणे

डिसेंबर २०११ मध्ये पुणे येथे संपन्न झालेल्या भिडे संमेलनाच्या अध्यक्षांची म्हणजे मेजर जनरल श्री. संजय वामन भिडे यांच्या मातोश्री सौ. सुमती वामन भिडे, (जन्म १९२८) पुणे. या सामान्य कुटुंबातील एक असामान्य कर्तृत्व असलेली एक माता. त्यांच्या कर्तृत्त्ववान आयुष्याची ओळख करून घेण्याचा हा एक प्रयत्न आहे.

सौ. सुमतीताईंना लहानपणापासून सर्व कलांची आणि वाचन, लेखन, खेळ, नाट्याभिनय या सर्व क्षेत्रांची आवड होती. १९४३ मध्ये वयाच्या १५ व्या वर्षी श्री. वामनराव भिडे यांचेशी प्रेमविवाह झाला. सुदैवाने दोघांच्या आवडी निवडी साधारणपणे सारख्याच होत्या. दोघे बॅडमिंटन एकत्र खेळले. बॅडमिंटन खेळाच्या स्पर्धेत भाग घेऊन त्यात त्यांनी पारितोषिके प्राप्त केली. महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात दरवर्षी यांचा सहभाग असे आणि नाट्याभिनयाची आवड असल्यामुळे त्यांनी 'तुझे आहे तुजपाशी', 'प्रेमा तुझा रंग कसा' अशासारख्या नाटकातील अभिनयाबद्दल पारितोषिके मिळविली आहेत. रवींद्रनाथ टागोर जन्मशताब्दि समारंभात झालेल्या 'काबुलीवाला' या हिंदी नाटकात त्यांनी अभिनयाचे पारितोषिक पटकाविले. याच बरोबर लेखन क्षेत्रातसुद्धा त्यांची कामगिरी चांगली होती. त्या बऱ्याच मासिकातून नियमित लेखन करीत असत. दिवाळी अंकातून त्यांचे लेख, कविता दरवर्षी प्रसिद्ध होत असत आणि यापैकी कांही लेखनासाठी त्यांना पारितोषिके मिळाली होती.त्यांच्या लघुकथांचा एक संग्रह 'ताजवा' या नावाने प्रसिद्ध झाला आहे.

समाजकार्यातहि त्या मागे नव्हत्या. युद्धकाळांत सैनिकांना स्वेटर विणून देणे. महिला दिन च्या निमित्ताने सैनिकांसाठी निधीसंकलन, मुलांसाठी संस्कारवर्ग आणि तेही सातत्याने १५/१६ वर्षे एवढा काळ चालविले. मुलांना रामरक्षा, रामायण आणि शिवचरित्र यांतील गोष्टी इ. च्या माध्यमातून मुलांवर संस्कार करण्याचे कार्य त्यांनी बरीच वर्षे केले. महिलांमधील कलागुणांना प्रोत्साहन मिळावे म्हणून ''नटराज'' महिला मंडळाची स्थापना केली. मंडळाच्या सुमारे १०० महिला सदस्य झाल्या होत्या. 'भगिनी निवेदिता' कथाकथन स्पर्धेत २ वेळा प्रथम पारितोषिक मिळविले. रोटरी इंटरनॅशनलतर्फे या जोडप्याचा त्यांच्या समाजकार्याबद्दल सत्कार केला गेला.

एवढ्या सर्व क्षेत्रात यशस्वी संचार करून एक सामान्य अशा कुटुंबातील सौ. सुमनताईंनी त्यांच्याकडे असलेल्या कलागुणांचे दर्शन इतरांना घडविले आणि इतरांच्या मुलासारखेच आपल्या तिन्ही मुलांवर उत्तम संस्कार केलेच आणि त्यांना उच्च शिक्षित होण्यास सर्वतोपरी सहाय्य केले. त्यांची तिन्ही मुले आपआपल्या क्षेत्रात चांगले काम करीत आहेत. यांचा मोठा मुलगा अहमदाबाद येथे एका चांगल्या कंपनीत डायरेक्टर होऊन निवृत्त झाला. तर दुसरे पुत्र श्री. संजय आर्मीमध्ये मेजर जनरल या पदावर आहेत. मुलगी सौ. लता उच्च शिक्षित M.D. Computer Diploma Holder असून विद्यापीठात बॅडमिंटनची चॅम्पियन झाली. हे सर्व मिळविणाऱ्या सौ. सुमती भिडे यांनी प्रारंभीच्या काळात अगदी रु. १००/- पगारावर नोकरी केली. मात्र हे सर्व करताना त्यांना स्वत:चे शिक्षण घेता आले नाही. यांचे यजमान श्री. वामनराव यांनी रात्रपाळी करून दिवसा शिक्षण घेऊन एका मोठ्या आस्थापनांत डायरेक्टर पदापर्यंत गेले होते.

एका सामान्य व गरीब अशा कुटुंबातील सौ. सुमतीबाईंनी काटकसरीने संसार करून कुटुंबातील सर्वांना संस्कार व शिक्षणाच्या माध्यमातून यशस्वी होण्यासाठी सहाय्य व प्रोत्साहन दिले आणि स्वत:ला शिक्षण घेता आले नसले तरी आपल्यातील कलागुणांची जोपासना करून सर्व आवडीच्या क्षेत्रांत यश संपादन केले. श्री. वामनराव आणि सौ. सुमतीबाई दोघंही हौशी, सर्व नातेवाईकांशी चांगले संबंध ठेवणारे अनेक मित्रमंडळी असणारे असे जोडपे आहे.

अशा एका मातेबद्दल तिचा सुपुत्र,कर्नल संजय याने मातेला पाठविलेल्या एका पत्रात लिहिलेला मजकूरच त्याच्या आईच्या कलागुणांची जोपासना करण्याच्या जिद्दीची साक्ष देतो.

सौ. सुमतीताईंनी यापूर्वी आम्ही भिडे अंकासाठी सुद्धा एक लेख आणि कविता पाठविली होती. ती आपण अनुक्रमे अंक क्र. आणि मध्ये छापली होती. ती दोन्ही वाचनीय आहेत. अशा या सौ. सुमतीताईंचे आपण अभिनंदन करूया आणि या दोघांना दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्यदायी शुभेच्छा देऊया !

धाकटा मुलगा भारतीय सेनादलात मेजर जनरल या पदावर आहे. त्यांच्या लघुकथेस २०१० च्या दिवाळी अंक स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले. त्यावेळी त्यांच्या मेजर जनरल मुलाचे आईला आलेले बोलके पत्र : -

My Dear Mom,

Yes, you have had a very remarkable life with ups and downs. But through it all both of you, gave us children the very best of every thing and happliness. I now feel that you were looking after all of us you could not pursue your natural talent at literature to the extent that you would have liked. It is good that you have kept at if even to this day and your are getting recognition.

Yours,
Sanjay

**सौ. सुमती भिडे,**
**५८, नटराज, कर्वेनगर, पुणे - ५२.**
**फोन - २५४४ ११६१**

(अशा या सामान्य कुटुंबाचे असामान्यत्व त्यांच्या यशस्वी जीवनाचा आलेख पाहून अधोरेखित होत आहे.)

## निवेदन

**भरघोस व्याजाचे आमिष दाखवून अनेकवेळा लोकांची फसवणूक झाल्याच्या बातम्या आपण वर्तमानपत्रात वाचतो. त्या अनुषंगाने कोणाही व्यक्तीने अशा प्रकारे मागणी केल्यास, त्याची खातरजमा केल्याशिवाय आर्थिक व्यवहार करू नयेत, अन्यथा असे आर्थिक व्यवहार खाजगी किंवा वैयक्तिक असतील त्याचा नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानशी कोणताही संबंध नाही. याची समस्त भिडे कुलोत्पन्नांनी दखल घ्यावी ही विनंती.**

**कार्यकारिणीच्या आदेशान्वये - नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान करिता**
**(शशिकुमार भिडे) (चंद्रकांत भिडे)**
**कार्याध्यक्ष कार्याध्यक्ष**

# सु श्री निवेदिता भिडे

'उपाध्यक्षा' विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी



माझी मुलगी निवेदिता भिडे हिचा जन्म वर्धा येथे १९५८ साली झाला. कॉलेजमध्ये गेल्यावर निरनिराळ्या विचारांच्या मैत्रिणींसोबत सद्यस्थितीवर चार्चा करताकरता, तिचा हळूहळू निश्चय होऊ लागला की, पदवी मिळविणे मग नोकरी करणे व शेवटी लग्न करून संसारात गुरफटणे या रूढ मार्गाने जाण्यापेक्षा समाजसेवा करण्याचा मार्ग शोधावा.

ती १९७७ साली बी.एस.सी. उत्तीर्ण झाली. त्यापूर्वी १९७६ मध्ये तिला एका गटाबरोबर दक्षिण भारताच्या प्रवासाला जायला मिळाले. कन्याकुमारी येथे गेली असताना, विवेकानंद केंद्रात काही तरूण-तरुणी प्रशिक्षणार्थींची भेट झाली. त्यांचा आदर्श ठेवून तिने माननीय एकनाथजी रानडे यांना पत्र लिहिले व केंद्रात काम करण्याची इच्छा दर्शविली.

मा. एकनाथजी एप्रिल-मे १९७७ मध्ये वर्धा येथे आले व त्यांनी निवेदिता हिची भेट घेऊन सर्व चौकशी केली. तिच्या मातापित्यांना (आम्हाला) भेटून त्यांची तिला जाण्यास संमती आहे का ? हे विचारले. त्यांची संमती मिळाल्यावर त्यांनी तिला जूनमध्ये सुरू होणाऱ्या प्रशिक्षणार्थी वर्गाला येण्यास सांगितले. त्याप्रमाणे अमरावती येथील अपर्णा पालकर व निवेदिता दोघी मिळून कन्याकुमारीला जाऊन प्रशिक्षण वर्गात भरती झाल्या.

सध्या 'अपर्णा पालकर' यांच्यावर केंद्राचे 'व्यवस्थाप्रमुख' हे दायित्व आहे.

निवेदिताला प्रशिक्षण झाल्यावर कन्याकुमारी येथेच किंडर गार्डन वर्ग सुरू करण्यास सांगितले. दरम्यान निवेदिताचा बी.एस्.सी चा निकाल आला. त्यात ती मेरिटमध्ये ८ व्या क्रमांकावर उत्तीर्ण झाली व तिला रु. २५०/- शिष्यवृत्ति पण पुढे एम्.एस्.सी. करण्या करिता मंजूर झाली. हे वर्तमान तिला कन्याकुमारीला कळविल्यावर, तेथील प्रशिक्षणार्थी बंधूंनी व केंद्राच्या अधिकाऱ्यांनीही तिला पुढचे शिक्षण चालू ठेवण्याचा आग्रह केला. पण तिची विशेषता ही की तिने ते नाकारून कन्याकुमारी येथेच 'जीवनव्रती' म्हणून राहण्याचे ठरविले. तिने असे सांगितले की ''न जाणो एम्.एस्.सी झाल्यावर किंवा करता करता अनेक मोह निर्माण होऊन माझा हा समाजसेवेचा मार्गच बदलू शकतो.''

तिने सुरू केलेले किंडर गार्टन चे वर्ग दर वर्षी वाढतवाढत प्राथमिक विद्यालय नंतर पूर्व माध्यमिक व माध्यमिक विद्यालयात परिणत होऊ लागले तेव्हा तिची बी.एस.सी. पदवी अपुरी वाटल्यामुळे तिने खाजगी अभ्यास करून अण्णामलाई विद्यापीठाची इतिहास विषयात एम.ए. ही पदवी उत्तीर्ण केली. पुढे माध्यमिक विद्यालयात प्रमुखाला बी.एड्. होणे तमिळनाडू सरकारी नियमात आवश्यक असल्याने नागपूर येथे विवेकानंद केंद्रात काम करताकरता तिने १९८८ मध्ये नागपूर विद्यापीठातून बी.एड्. ही पदवी घेतली.

विवेकानंद विद्यालयाची प्रमुख म्हणून काम केल्यावर तिच्याकडे विवेकानंद केंद्राच्या शाळा ज्या अरुणाचल प्रदेश, आसाम वा अन्य भागात आहेत त्यांचे दायित्व आले व विवेकानंद केंद्राची शिक्षण विभागाची 'कार्यवाह' म्हणून बरीच वर्षे तिने काम पाहिले.

त्यावेळी 'दक्षिणपूर्व आशियाच्या' साक्षर व प्रौढ शिक्षा'' या यूनो तर्फे होणाऱ्या ऑस्ट्रेलियाला झालेल्या परिषदेला गैर सरकारी (एन्.जी. ओ.) प्रतिनिधी म्हणून भारताचे प्रतिनिधित्व तिने केले.

त्यावेळी तिने प्यारेलाल या गांधीजींच्या अंतेवासीयाने लिहिलेल्या "The Beautiful Tree" या पुस्तकाच्या आधारे जेव्हा प्रतिपादन केले की 'ब्रिटिशपूर्व काळात हिंदुस्थानात ७५% लोक सुशिक्षित होते व ब्रिटिशांनी जुनी शिक्षण पद्धती सोडून इंग्रजी शिक्षणपद्धती सुरू केली. त्यामुळे ब्रिटिश आमदनीतच साक्षरतेचे प्रमाण घसरून निरक्षरतेचे प्रमाण वाढले, ''असे ठाम प्रतिपादन ऐकून त्या परिषदेतील सर्व प्रतिनिधी अवाक् झाले.

इ.स. २००१ मध्ये तिची निवड विवेकानंद केंद्राची 'उपाध्यक्ष' म्हणून झाली. तिच्याकडे आता दरवर्षी होणाऱ्या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याचे प्रमुख काम आहे. त्यांनी ईशान्य प्रदेशातील वनवासी बांधवांच्या राहणीमानाचा विशेष अभ्यास केला असून गुवाहाटी (आसाम) येथील विवेकानंद केंद्राच्या ''संस्कृति'' संस्थेच्या (Institute of Culture) कार्यालयात उत्साहाने भाग घेऊन मार्गदर्शन करतात. त्यांनी एकनाथजींचे चरित्र, वेदकालीन स्त्रिया, अमेरिकेत विवेकानंद अशी इंग्रजीत पुस्तके लिहिली. शिवाय गीता, उपनिषदे, रामायण, भारतीय संस्कृती, शिक्षण, श्री विवेकानंद, रामकृष्ण परमहंस यांसारख्या अनेक विषयांवर प्रवचने दिली आहेत.

**रघुनाथ श्रीकृष्ण भिडे, नागपूर.**

# विवेकानंद केंद्राची 'जीवनव्रती' एक भिडे कन्या - कु. निवेदिता भिडे

कु. निवेदिता भिडे, रघुनाथ श्रीकृष्ण भिडे, नागपूर यांची कन्या महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानांच पुढील आयुष्यात शिक्षण, नोकरी, संसार या सर्वमान्य मार्गाने न जाता काहीतरी करावं आणि समाजसेवा करावी असा विचार करते. शिक्षणात गुणवत्तायादीमध्ये येण्याची पात्रता असताना पुढील शिक्षण न घेता समाजासाठी काहीतरी करावं असा विचार करणारी ही मुलगी विवेकानंद केंद्रात काम करण्याचे ठरवून तेथे केंद्राचे उपाध्यक्षपदापर्यंत जाऊन अनेक मोठ्या जबाबदारीच्या कामांच्या माध्यमातून आपल्याकडे असलेल्या सद्गुणांच्या आधारे घरातील ज्येष्ठांच्या संघकार्याच्या संस्काराचा वारसा पुढे नेण्याचे मोठे काम करते. त्यासाठी आजन्म अविवाहित राहण्याचे ठरवून आपले संपूर्ण आयुष्य विवेकानंद केंद्रासाठी समर्पित करणाऱ्या या भिडे कन्येला आम्ही सर्व समस्त भिडे मंडळी आणि भिडे प्रतिष्ठानच्या वतीने मानाचा प्रणाम करीत आहोत. आम्हा सर्वांना त्यांचा सानंद अभिमान वाटतो. त्यांचे कार्य असेच चालू रहावे यासाठी उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य मिळावे यासाठी आपण परमेश्वराकडे प्रार्थना करू या !

कु. निवेदिताचे काका कै. लक्ष्मणराव भिडे, यांनी संघाचे कार्य देशांत आणि परदेशांत पसरविण्याचे मोठे काम केले होते. स्वत: अविवाहित राहून संपूर्ण आयुष्यभर संघवृद्धीचे काम त्यांनी अखंडपणे केले. तसेच निवेदिताचे एक बंधू श्रीकृष्ण रघुनाथ हे संघाच्या माध्यमातून वनवासी विभागात सतत कांही वर्षे काम करीत आहेत. आपले काका आणि बंधू यांच्याकडून जणू बाळकडूच निवेदिता यांनी घेतले आहे.

त्यांना या 'जीवनव्रती' होऊन विवेकानंद केंद्राच्या कार्यासाठी

अनेक अनेक शुभेच्छा !

# ''सूर्यशक्ति''

सध्या दूरदर्शनवर एक विज्ञापन (जाहिरात) दाखविली जाते. एक लहान मुलगी ओंजळीमधून काही घेऊन आईपाशी येते व म्हणते ''आई हे जपून ठेव.'' आई विचारते हे काय आहे ? ती उत्तरते ''ऊन'' या ''ऊन'' मध्येच सर्व ''सूर्यशक्ति'' आधुनिक भाषेत ''सौरऊर्जा'' SOLAR ENERGY सामावली आहे.

प्राचीन काळापासून भारतीय महिलांनी ''सूर्यशक्ति'' ओळखली आहे. भारतीय महिला शेती मालावर प्रक्रिया करून वर्षाच्या बेगमीच्या पदार्थांची सोय करतात. त्यांच्या कोठीच्या खोलीत काय–काय सामावले आहे याचा पुरुष मंडळींना मागमूसही नसतो. अगदी शेतातून आलेल्या धान्यापासून पापड–कुरडयाच काय, बाहेर कोसळणाऱ्या भर पावसात सुद्धा पानांत पडणारी हरभऱ्याच्या पानाची भाजी पाहून अचंबित होत. ही किमया आहे ''सूर्यशक्ति''ची.

या सूर्यशक्तीचा वापर करून भारतीय महिला असंख्य पूरक खाद्यपदार्थ तयार करून आपल्या भांडारात साठवत असत व योग्य वेळी त्याचा उपयोग करून आपल्या कुटुंबाला चविष्ट व स्वादपूर्ण ''जेवण'' देत असत.

आधुनिक सिमेंट कॉंक्रिटच्या जंगलात राहणारा माणूस या जेवणास वंचित झाला आहे, तो फक्त ब्रेक फास्ट, लंच, डिनर, फास्टफूड याच्या आधीन होऊ लागला आहे.

सौर (सूर्य शक्ति) चे महत्त्व सांगली मधील जयश्री संजय भिडे या महिलेने ओळखले व त्याचा व्यापारी तत्त्वावर उपयोग सुरू केला, त्यांच्या जय गृह उद्योग या व्यवसायात ''सूर्य शक्ति'' चा वापर करून शेतीमालावर प्रक्रिया केली जाते. शेती मालाचे ''निर्जलीकरण'' (Dehydration) करणे हा आता त्यांचा हातखंडा उद्योग झाला आहे. त्या कांदा, लसूण, हिरवी मिरची, रताळे, गाजर, चिंच, पुदिना याचे सौर शक्तीच्या आधारे निर्जलीकरण करून या सर्व पदार्थांना पुडीचे/भुकटीचे (पावडरचे) स्वरूप देतात. या सर्व ''पुडी'' 'पेशवाई' या व्यापारी नावाने पाऊच पॅकिंगमध्ये विकल्या जातात.

नुकताच सांगली येथे ''कृष्णाई महोत्सव २०१२'' संपन्न झाला. हा महोत्सव म्हणजे ''महिला बचत गट'' उत्पादित मालाचे विक्री प्रदर्शन असते. त्या प्रदर्शनात जयश्री संजय भिडे यांची सर्वच उत्पादने विक्रीस होती. सौर ऊर्जेचा वापर करून चाकोरीबाहेरील उत्पादनांचे बाबत त्यांना ''उत्तेजनार्थ बक्षीस'' देऊन गौरविण्यात आले. अशी आहे ''सूर्य शक्ती''ची महती !

**विजय विष्णू भिडे,**
**सांगली**

# महाराष्ट्र चित्पावन संघ वधू-वर सूचक मंडळ

## ऑन लाईन वधु-वर विषयी सूचना

१) साईटचे नाव matrimonychitpavan.com

२) नवीन रजिस्टर करताना साईटवर जाऊन Register करणे. एका ईमेल ॲड्रेसवर एकच स्थळ नोंदविता येईल. आपण स्वत:च User ID व Passward द्यावा. संपूर्ण डेटा भरून Profile Publish करा. फोटो अल्बमही Upload करू शकता.

३) एकदा Data संपूर्ण भरून झाल्यानंतर User ID व Passward च्या सहाय्याने log-in करावयाचे आहे.

४) Data भरताना काळजीपूर्वक भरा. अपडेट करावयाचा असल्यास प्रथम Unpublish करून Edit करा. Save करा व शेवटी पुन्हा Publish करा.

५) तुमचा Profile, Publish on . . . . . . . . . . . . . . . व Expired on . . . . . . . . . . . . . . यासह दिसेल.

६) स्वत:चा Profile बरोबर असल्याची खात्री करा.

७) Search Mode मध्ये Advance Search मध्ये अटी सिलेक्ट करा. तुम्ही अटी करू शकता.

८) Search मधून Select करून मेसेज पाठवा आणि Add to my choice करा. तुम्ही मेसेज केलेल्या व्यक्तीनेही तुम्हाला my choice मध्ये Add केले तरच Contact Details Open होतील.

९) जर तुम्हाला मधील माहितीत बदल करायचा असेल तर प्रथम Profile unpublish करा. योग्य तो बदल करा त्यानंतर ते पेज सेव्ह करा व शेवटी Profile पुन्हा Publish करा.

१०) संघामध्ये डिसेंबर २०१० ते डिसेंबर २०११ या कालावधीत नोंदणी केलेल्या वधु-वरांचे फॉर्म नेटवर भरून झालेले आहेत. त्यांनी मुदत संपल्यानंतर Renew करण्यासाठी फक्त शुल्क भरावे.

साप्ताहिक प्राजक्त
२८७, 'डी' वॉर्ड, कसबा गेट
गंगावेस रोड, कोल्हापूर.
फोन नं. ०२३१-२५४०८२९

पेशवाई
दर्जेदार मसाले व खाद्यपदार्थ यांचे उत्पादक
*थालीपीठ भाजणी, उपवास भाजणी,
वरीविरहित उपवास भाजणी, अनारसे पीठ, मेतकूट, डांगर
*कांदा पूड, लसूण पूड, हिरवी मिरची पूड, पुदीना पूड,
रताळे पूड, केळी पूड, कढीपत्ता पूड, चिंचपूड व कसूरी मेथी
*गोडा मसाला, कांदालसूण मिरची मसाला, दाबेली मसाला,
पावभाजी मसाला, संडे मसाला, गरम मसाला,
मसाले भात मसाला, पुलाव मसाला, बिर्याणी मसाला व
बरेच काही
**उत्पादक : जयश्री संजय भिडे.**
प्रोप्रा. - जय गृह उद्योग
१११९/१, उत्तर शिवाजी नगर, कै. विष्णू विनायक भिडे मार्ग,
(श्री गणपती गॅस गोडाऊन जवळ), **सांगली - ४१६ ४१६**
फोन : ०२३३-२३२१०१८/९९२१२४७३६२/९२०९२३७९५७
e-mail-peshwaimasale@gmail.com
Visit : www.peshwai.weebly.com Visit : www.sangli360.com

प्रकाश प्रकाशनाचे हे साप्ताहिक प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७, 'डी' वॉर्ड, गंगावेस, कोल्हापूर येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.
मालक, संपादक, प्रकाशक : श्री. प्रफुल्ल डबीर RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI
(या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)